निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
गुरुवार
१९ फेब्रुवारी २०२६
पाने: ०४ किंमत: २ .००
वर्ष: १५ वे अंक: ३५४ वा

RNI.No.MAH/MAR2011/39247

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. G 2/RNP/AGD-441/2024-26 | मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे

## विवेक भीमनवार यांनी स्वीकारला महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) अध्यक्षपदाचा कार्यभार

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी**/महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) अध्यक्षपदी विवेक लक्ष्मण भीमनवार यांची नियुक्ती करण्यात आली असून, आज त्यांनी आपल्या पदाची कायदेशीर शपथ घेतली. मुंबईतील 'लोकभवन' येथील कॉन्फरन्स सभागृहात आयोजित एका दिमाखदार सोहळ्यात हा शपथविधी सोहळा पार पडला.

राज्याचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी विवेक भीमनवार यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. या नियुक्तीमुळे आयोगाला आता पूर्णवेळ आणि अनुभवी नेतृत्व मिळाले असून, स्पर्धा परीक्षा देणाऱ्या उमेदवारांमध्ये सकारात्मक वातावरण पाहायला मिळत आहे.

या महत्त्वपूर्ण कार्यक्रमाला राज्यातील दिग्गज नेत्यांनी उपस्थिती लावली होती. देवेंद्र फडणवीस: मुख्यमंत्री,एकनाथ शिंदे: उपमुख्यमंत्री,रजनीश शेठ: आयोगाचे माजी अध्यक्ष यासोबतच प्रशासकीय क्षेत्रातील अनेक मान्यवर या सोहळ्याचे साक्षीदार झाले.



यामध्ये आयोगाचे सचिव महेंद्र उत्तमराव हरपाळकर, सदस्य डॉ. अभय वाघ, डॉ. दिलीप पाटील-भुजबळ, राजीव निवतकर आणि डॉ. सतीश देशपांडे यांचा समावेश होता. विधी व न्याय विभागाचे प्रधान सचिव दिलीप घुमरे देखील यावेळी उपस्थित होते.

विवेक भीमनवार यांच्यापुढील आव्हाने

विवेक भीमनवार हे अनुभवी प्रशासकीय अधिकारी म्हणून ओळखले जातात. त्यांच्या नियुक्तीनंतर आयोगाच्या कामकाजात अधिक सुसूत्रता येण्याची अपेक्षा आहे. विशेषत **परीक्षांचे वेळापत्रक:** प्रलंबित परीक्षा आणि त्यांचे निकाल वेळेवर लावणे.**पारदर्शकता:** भरती प्रक्रियेत अधिक पारदर्शकता आणणे.

**विद्यार्थी संवाद:** परीक्षार्थींच्या तक्रारी आणि समस्यांचे जलद निराकरण करणे.या सोहळ्यानंतर भीमनवार यांनी मान्यवरांचे आभार मानले आणि लवकरच आयोगाच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेणार असल्याचे संकेत दिले.

## 'द अर्थशॉट प्राइज' २०२६ चा सोहळा मुंबईत; स्वच्छ हवा आणि ऊर्जेला राज्य शासनाचे प्राधान्य

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी**/जागतिक स्तरावर पर्यावरणातील 'ऑस्कर' मानला जाणारा 'द अर्थशॉट प्राइज' (The Earthshot Prize) हा प्रतिष्ठित सोहळा नोव्हेंबर २०२६ मध्ये मुंबईत आयोजित केला जाणार आहे. राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांनी 'मुंबई क्लायमेट वीक' दरम्यान ही महत्त्वाची घोषणा केली. यावेळी त्यांनी स्वच्छ हवा, हरित ऊर्जा आणि शाश्वत वाहतूक व्यवस्था ही राज्य शासनाची मुख्य प्राथमिकता असल्याचे अधोरेखित केले.

या कार्यक्रमाला अर्थशॉट प्राइजचे मुख्य कार्यकारी अधिकारी जेसन नॉफ, पर्यावरण विभागाच्या सचिव जयश्री भोज आणि इतर मान्यवर उपस्थित होते.




मंत्री पंकजा मुंडे यांनी यावेळी अर्थशॉट प्राइजच्या पाच मुख्य उद्दिष्टांवर प्रकाश टाकला:

१. स्वच्छ हवा,२. कचरामुक्त जग,३. निसर्ग संवर्धन,४. सागरी परिसंस्थेचे पुनरुज्जीवन व ५. हवामान सुधारणा त्या म्हणाल्या, कोणत्याही विकासात स्वच्छ पाणी, स्वच्छ हवा आणि स्वच्छ माती या त्रिसूत्रीवर लक्ष केंद्रित केल्यास निसर्गाचे संरक्षण आपोआप होते. महाराष्ट्राला मोठी किनारपट्टी लाभली आहे, त्यामुळे सागरी पर्यावरण रक्षणासाठी आम्ही नैसर्गिक उपाययोजनांवर भर देत आहोत.

औद्योगिक प्रगती आवश्यक असली तरी त्यासोबत येणाऱ्या जबाबदारीची जाणीव ठेवणे गरजेचे असल्याचे मंत्री मुंडे यांनी स्पष्ट केले. **स्थानिक कृती, जागतिक परिणाम:** स्थानिक पातळीवर घेतलेले छोटे निर्णय जागतिक हवामान बदलावर सकारात्मक परिणाम करू शकतात.**कचऱ्यातून ऊर्जा:** वैज्ञानिक कचरा व्यवस्थापन, चक्रीय अर्थव्यवस्था (Circular Economy) आणि कचऱ्यापासून ऊर्जा निर्मिती यावर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून काम सुरू आहे.**आर्थिक विकास:** पर्यावरण संवर्धन हे केवळ निसर्गासाठी नसून ते आर्थिक विकासालाही चालना देणारे आहे, हे भारताने जगाला सिद्ध करून दाखवले आहे.

**'मूनशॉट' ते 'अर्थशॉट'**

अर्थशॉट प्राइजचे मुख्य कार्यकारी अधिकारी जेसन नॉफ यांनी यावेळी भारताच्या योगदानाचे कौतुक केले. ते म्हणाले, ज्याप्रमाणे मानवाने चंद्रावर जाण्याचे धाडसी ध्येय (चेपीहें) गाठले, तसेच आता पृथ्वी वाचवण्यासाठी मोठ्या पावलांची गरज आहे. या उपक्रमात भारताने आतापर्यंत सर्वाधिक विजेते देऊन आपले जागतिक नेतृत्व सिद्ध केले आहे.भारतात प्रथमच अर्थशॉट प्राइजचे आयोजन होत आहे. नोव्हेंबर २०२६ मध्ये मुंबई जागतिक पर्यावरण चळवळीचे केंद्र ठरेल.मार्गदर्शन, तंत्रज्ञान आणि गुंतवणुकीसाठी हे एक सक्षम व्यासपीठ ठरणार आहे.




## महाराष्ट्रातील ७ राज्यसभा जागांसाठी १६ मार्चला रणधामूम; निवडणूक आयोगाकडून कार्यक्रम जाहीर

**आत्ताच एक्सप्रेस**

**नवी दिल्ली/प्रतिनिधी**/भारतीय निवडणूक आयोगाने देशातील १० राज्यांमधील रिक्त होणाऱ्या राज्यसभेच्या ३७ जागांसाठी द्विवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम आज जाहीर केला. यामध्ये महाराष्ट्रातील ७ महत्त्वाच्या जागांचा समावेश असून, या जागांसाठी येत्या १६ मार्च २०२६ रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे.

**महाराष्ट्रातील 'हे' दिग्गज सदस्य होणार निवृत्त**

येत्या २ एप्रिल २०२६ रोजी महाराष्ट्रातील ज्या ७ सदस्यांचा कार्यकाळ संपत आहे, त्यामध्ये अनेक बड्या नेत्यांचा समावेश आहे.१. शरदचंद्र पवार (NCP-SP),२. रामदास आठवले (RPIAA),३. डॉ. भागवत कराड (BJP),४. प्रियंका चतुर्वेदी (Shiv Sena - UBT),५. डॉ. फौजिया खान (NCP-SP),६. धैर्यशील पाटील (BJP) व ७. रजनी पाटील (INC)

**निवडणुकीचे सविस्तर वेळापत्रक**

निवडणूक आयोगाने दिलेल्या माहितीनुसार, या प्रक्रियेचा टप्पा खालीलप्रमाणे असेल:

अधिसूचना जारी होणे: २६ फेब्रुवारी २०२६

उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख: ५ मार्च २०२६

अर्जांची छाननी: ६ मार्च २०२६

अर्ज मागे घेण्याची मुदत: ९ मार्च २०२६

मतदानाचा दिनांक: १६ मार्च २०२६ (सकाळी ९ ते दुपारी ४)

मतमोजणी आणि निकाल: १६ मार्च २०२६ (संध्याकाळी ५ वाजता)

मतदानासाठी 'जांभळ्या' शाईचा वापर बंधनकारक

निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी आयोगाने विशेष सूचना दिल्या आहेत. मतदारांना (आमदारांना) पसंतीक्रम नोंदवण्यासाठी निवडणूक अधिकाऱ्यांनी पुरवलेल्या विशेष जांभळ्या स्केच पेनचाच वापर करावा लागणार आहे. इतर कोणत्याही पेनने केलेले मतदान अवैध ठरवले जाईल.




**इतर राज्यांतही निवडणुकांचे वारे**

महाराष्ट्रासह ओडिसा (४ जागा), तामिळनाडू (६), पश्चिम बंगाल (५), आसाम (३), बिहार (५), छत्तीसगड (२), हरियाणा (२), हिमाचल प्रदेश (१) आणि तेलंगणा (२) या राज्यांमध्येही ही निवडणूक प्रक्रिया पार पडणार आहे. संपूर्ण निवडणूक प्रक्रिया २० मार्च २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

## देवगिरी महाविद्यालयात विद्यार्थ्यांची आर्थिक लूट

### वंचित बहुजन युवा आघाडी आक्रमक, जनआंदोलनाचा इशारा!

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी/** शहरातील नामांकित देवगिरी महाविद्यालयात विद्यार्थ्यांकडून शुल्काच्या नावाखाली **'खंडणी'** वसूल केली जात असल्याचा खळबळजनक आरोप वंचित बहुजन युवा आघाडीने केला आहे. या संदर्भात शहराध्यक्ष (पश्चिम) राहुल मकासरे यांच्या नेतृत्वाखाली महाविद्यालय प्रशासनाला धारेवर धरत निवेदन सादर करण्यात आले. मागण्या मान्य न झाल्यास तीव्र जनआंदोलन उभारण्याचा इशारा देण्यात आला आहे.

**प्रशासनाचा मनमानी कारभार आणि 'फी'च्या नावाखाली लूट**

निवेदनात नमूद केल्यानुसार, शासन निर्णय डावलून महाविद्यालयात विद्यार्थ्यांकडून अनापेक्षितरीत्या फी वाढ करण्यात आली आहे. विशेषतः मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून बेकायदेशीरपणे फी वसूल केली जात असून, ही रक्कम तात्काळ व्याजासह परत करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच, जनरल कॅटेगरीच्या विद्यार्थ्यांकडून 'फी डिफरन्स'च्या नावाखाली होणारी लूट थांबवून दोषी कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी राहुल मकासरे यांनी केली आहे.

**मुलींच्या मोफत शिक्षणाच्या निर्णयाला हरताळ**

राज्य सरकारने मुलींना मोफत शिक्षण देण्याचा निर्णय घेतला असतानाही, देवगिरी महाविद्यालयात मुलींकडून पैसे वसूल केले जात असल्याचे समोर आले आहे. ९ जुलै २०२४ पासून ज्या विद्यार्थिनींकडून फी घेतली आहे, ती १५ दिवसांच्या आत परत न केल्यास गंभीर परिणामांना सामोरे जावे लागेल, असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे.

**शासन निर्णयाची अंमलबजावणी:** सामाजिक न्याय विभागाच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर तात्काळ कारवाई व्हावी.

फी परतावा: मागासवर्गीय आणि विद्यार्थिनींकडून घेतलेली फी व्याजासह परत करावी.

**मानसिक त्रासाबद्दल माफी:** चुकीच्या पद्धतीने फी वाढ करून विद्यार्थ्यांना जो मानसिक व आर्थिक त्रास दिला, त्याबद्दल प्रशासनाने लेखी माफी मागावी.

PRN **समस्या:** तांत्रिक चुकांमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळून त्यांच्या समस्यांचे तातडीने निराकरण करावे.




**संविधानिक हत्यार उपसणार!**

राहुल मकासरे यांनी प्रशासनाला इशारा दिला आहे की, जर या मागण्यांकडे दुर्लक्ष केले गेले, तर आम्ही गप्प बसणार नाही. विद्यार्थ्यांच्या हितासाठी आम्ही 'संविधानिक हत्यार' उपसून महाविद्यालय आणि प्रशासनाविरोधात मोठे जनआंदोलन उभे करू.

या निवेदनाच्या प्रती ॲड. प्रकाश आंबेडकर (राष्ट्रीय अध्यक्ष, वंचित बहुजन आघाडी), कुलगुरू (डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ) आणि समाज कल्याण विभागाच्या साहाय्यक आयुक्तांना पाठवण्यात आल्या आहेत. आता महाविद्यालय प्रशासन यावर काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## राज्यातील २ लाख आयटीआय विद्यार्थ्यांना मिळणार आपत्ती व्यवस्थापनाचे धडे; कौशल्य विकास विभागाचा महत्वपूर्ण निर्णय

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** नैसर्गिक किंवा मानवनिर्मित आपत्तीच्या काळात तातडीने मदतकार्य उपलब्ध व्हावे आणि तरुणांमध्ये देशसेवेची भावना रुजावी, या उद्देशाने राज्यातील २ लाख आयटीआय (ITI) विद्यार्थ्यांना आता आपत्ती व्यवस्थापनाचे शास्त्रोक्त प्रशिक्षण दिले जाणार आहे. कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबवण्यात येत असून, यासाठी 'अनिरुद्धाज् अकॅडमी ऑफ डिझास्टर मॅनेजमेंट' आणि कौशल्य विकास विभाग यांच्यात महत्वपूर्ण सामंजस्य करार (MoU) करण्यात आला आहे.प्रशिक्षणाचे स्वरूप आणि व्याप्तीया उपक्रमांतर्गत राज्यातील ४१९ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील (ITI) विद्यार्थ्यांना टप्प्याटप्प्याने प्रशिक्षण दिले जाईल. विशेष म्हणजे, 'अनिरुद्धाज् अकॅडमी ऑफ डिझास्टर मॅनेजमेंट' हे प्रशिक्षण पूर्णपणे विनामूल्य आणि प्रात्यक्षिकांसह देणार आहे.मंत्री मंगलप्रभात लोढा यांचे प्रतिपादनयावेळी बोलताना मंत्री लोढा म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'सशक्त भारत' संकल्पनेला बळकटी देण्यासाठी योग दिन



आणि खेलो इंडियासारखे उपक्रम राबवले जात आहेत. त्याच धर्तीवर राज्यात आयटीआयमध्ये 'क्रीडा महाकुंभ' आयोजित केला जातो. आता आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षणाच्या माध्यमातून देशसेवेसाठी सज्ज असलेली युवा पिढी घडवण्याचे काम आम्ही करत आहोत.त्यांनी अधोरेखित केलेले महत्त्वाचे मुद्दे:कोणतीही आपत्ती सांगून येत नाही, त्यामुळे पूर्वतयारी आवश्यक आहे.जिल्हा आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेला मदत करण्यासाठी प्रशिक्षित तरुणांची मोठी फळी तयार होईल.प्रत्येक नागरिकाने आपत्ती व्यवस्थापनाचे किमान ज्ञान घेणे ही काळाची गरज आहे.तज्ज्ञांचे मतसुनील मंत्री (CEO, अनिरुद्धाज् अकॅडमी): आम्ही शहरी आणि ग्रामीण अशा दोन्ही भागांतील आपत्तींचा अभ्यास करून हा विशेष प्रशिक्षण कार्यक्रम तयार केला आहे.

# प्रशासकीय 'स्पीडब्रेकर' आणि शहराच्या विकासाचा संथ वेग

जालना शहराच्या विकासात कणा समजल्या जाणाऱ्या बांधकाम क्षेत्राला सध्या महानगरपालिकेच्या 'लालफितीच्या' कारभाराचा मोठा फटका बसत आहे. प्रशासक आशिमा मित्तल यांच्या कार्यक्षमतेबद्दल जनमानसात आदर असताना, त्यांच्याच प्रशासनातील काही दुवे मात्र या प्रतिमेला तडा देण्याचे काम करत असल्याचे चित्र दिसत आहे. नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ड. महेश धान्नवाट यांनी उपस्थित केलेले प्रश्न केवळ एका क्षेत्रापुरते मर्यादित नसून, ते संपूर्ण शहराच्या आर्थिक आरोग्याशी संबंधित आहेत.

मुंबई उच्च न्यायालयाने 'मेसर्स स्पेसकॉन विरुद्ध महाराष्ट्र शासन' या प्रकरणात दिलेला निकाल अत्यंत स्पष्ट आहे. विकास आराखड्यापूर्वीच्या परवानग्या 'कमिटेड डेव्हलपमेंट' म्हणून संरक्षित आहेत. मात्र, जालन्यात या कायदेशीर बाबींकडे दुर्लक्ष करून किरकोळ कारणास्तव फाईल्स अडवून ठेवल्या जात आहेत. जेव्हा एखादा विकासक सर्व अटींची पूर्तता करतो, तेव्हा त्याला भोगवटा प्रमाणपत्र (Occupancy Certificate) नाकारणे किंवा विलंब करणे हे केवळ अनैतिकच नाही, तर न्यायालयाचा अवमान करणारे आहे. आशिमा मित्तल यांची ओळख एक कडक आणि शिस्तप्रिय अधिकारी अशी आहे. तरीही, त्यांच्यापर्यंत फाईल्स पोहोचू न देणे हा खालच्या स्तरावरील अधिकाऱ्यांचा 'गेम प्लॅन' तर नाही ना? अशी शंका घेण्यास वाव आहे. जर आयुक्तांपर्यंत फाईल्स पोहोचतच नसतील, तर निर्णय प्रक्रियेत होणाऱ्या विलंबाचे खापर साहजिकच सर्वोच्च पदावर बसलेल्या व्यक्तीवर फुटते. हा प्रकार म्हणजे प्रशासकाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्याचा एक सुनियोजित प्रयत्न वाटतो.

महानगरपालिकेच्या उत्पन्नाचा मुख्य स्रोत हा विकास शुल्क (Development Charges) आणि विविध कर असतात. फाईल्स अडकल्यामुळे:

मनपाचा महसूल बुडतोय: कोट्यवधी रुपयांचे शुल्क तिजोरीत येण्याऐवजी प्रलंबित राहत आहे.

प्रकल्प खर्च वाढतोय: विलंबामुळे बँकांचे व्याज वाढते, ज्याचा अंतिम भार घर खरेदी करणाऱ्या सर्वसामान्यांच्या खिशावर पडतो.

गुंतवणूकदारांचा विश्वास उडतोय: शहरात नवीन प्रकल्प येण्यास उद्योजक धजावत नाहीत.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार, जर अधिकाऱ्यांच्या दिरंगाईमुळे शासनाचे नुकसान होत असेल, तर त्याची वसुली संबंधित अधिकाऱ्यांच्या पगारातून व्हायला हवी. जालन्यातही हाच पॅटर्न राबवण्याची गरज आहे. केवळ बदली किंवा निलंबन पुरेसे नाही; तर 'आर्थिक नुकसानीला आर्थिक दंड' हाच यावरचा जालीम उपाय ठरू शकतो.प्रशासकांनी आता स्वतः मैदानात उतरून 'फाईल ट्रॅकिंग सिस्टीम'चा आढावा घेणे गरजेचे आहे. प्रत्येक फाईल कोणत्या टेबलावर किती दिवस पडून आहे, याचे ऑडिट व्हायला हवे. जे अधिकारी जाणीवपूर्वक अडथळे निर्माण करत आहेत, त्यांना बाजूला सारल्याशिवाय जालन्याचा विकास गती घेणार नाही.

जालना शहराला आज आधुनिक पायाभूत सुविधांची गरज आहे. बांधकाम क्षेत्र हा या विकासाचा रथ आहे. जर या रथाची चाके प्रशासकीय अकार्यक्षमतेच्या चिखलात रुतली, तर शहराचे नुकसान अटळ आहे. प्रशासक आशिमा मित्तल यांनी या 'गतिरोधकांचा' बंदोबस्त करून शहराच्या विकासाला पुन्हा एकदा गती द्यावी, हीच अपेक्षा.

# छत्रपती शिवाजी महाराज : भारतीय राष्ट्रवादाचे आद्य प्रतीक

भारतीय इतिहासाच्या अभ्यासात छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्थान केवळ एका पराक्रमी योद्ध्यापुरते मर्यादित ठेवणे ही एक मोठी बौद्धिक मर्यादा ठरेल. आधुनिक इतिहासलेखन, समाजशास्त्र आणि राज्यशास्त्र यांच्या दृष्टीने पाहिले असता शिवाजी महाराज हे एक राज्यसंस्थापक, लोककल्याणकारी प्रशासक, धर्मनिरपेक्ष दृष्टी असलेले नेतृत्व आणि भारतीय राष्ट्रवादाचे आद्य प्रतीक म्हणून समोर येतात. म्हणूनच १९ फेब्रुवारी रोजी साजरी होणारी शिवजयंती ही केवळ स्मृतिदिन नसून भारतीय राज्यसंस्थेच्या ऐतिहासिक मुळांचा पुनर्विचार करण्याची संधी आहे.

सतराव्या शतकातील भारताची राजकीय परिस्थिती अत्यंत अस्थिर होती. मुघल साम्राज्याचे केंद्रीकरण, दख्खनमधील आदिलशाही-कुतुबशाही यांचे संघर्ष, सरंजामी शोषण आणि धार्मिक-सामाजिक असुरक्षितता यांमुळे सामान्य जनता भयग्रस्त होती. अशा पार्श्वभूमीवर शिवाजी महाराजांचा उदय हा केवळ सत्तांतर नव्हता, तर राज्याच्या स्वरूपातच मूलभूत परिवर्तन घडवणारा होता. त्यांच्या स्वराज्याची संकल्पना ही परकीय सत्तेविरोधातील प्रतिक्रिया नव्हे, तर स्वतःच्या लोकांसाठी स्वतःचे राज्य उभारण्याची सकारात्मक राजकीय दृष्टी होती.

इतिहासकार जदुनाथ सरकार, गोविंद सखाराम सरदेसाई, जेम्स लेन, स्टीवर्ट गॉर्डन यांसारख्या अभ्यासकांनी आपल्या लेखनात शिवाजी महाराजांच्या नेतृत्वाचे विविध पैलू अधोरेखित केले आहेत. आधुनिक संशोधनानुसार, शिवाजी महाराजांचे स्वराज्य हे लोकसंमतीवर आधारित, नैतिक अधिष्ठान असलेले आणि प्रशासकीय शिस्तीवर उभे असलेले राज्य होते. हे राज्य रयतेचे आहे हा विचार केवळ घोषणात्मक नव्हता, तर महसूल व्यवस्था, न्यायव्यवस्था आणि संरक्षण धोरणांतून प्रत्यक्षात उतरवला गेला होता.

शिवाजी महाराजांच्या घडणीत जिजाऊ मातेचे योगदान अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. जिजाऊंच्या धार्मिक-नैतिक संस्कारांतून महाराजांमध्ये धर्मभावना निर्माण झाली, पण ती संकुचित नव्हती. रामायण-महाभारत, संत परंपरा आणि लोककथा यांमधून त्यांनी कर्तव्य, न्याय आणि लोकहित यांचे मूल्य आत्मसात केले. शहाजी राजांच्या अनुभवातून त्यांनी तत्कालीन राजकारणाची गुंतागुंत समजून घेतली. त्यामुळे शिवाजी महाराजांचे नेतृत्व भावनिक नसून विवेकाधिष्ठित होते.

स्वराज्याची उभारणी करताना शिवाजी महाराजांनी स्थानिक शक्तींना संघटित केले. मावळ प्रदेशातील शेतकरी, स्थानिक सरदार, कारागीर आणि सामान्य सैनिक हे स्वराज्याचे आधारस्तंभ होते. ही प्रक्रिया आधुनिक राज्यशास्त्रात सांगितल्या जाणाऱ्या सहभागी शासन संकल्पनेशी सुसंगत आहे. त्यामुळेच स्वराज्याला व्यापक सामाजिक पाठिंबा मिळाला. लोकांनी ते आपले राज्य मानले, हीच त्याच्या यशाची गुरुकिल्ली ठरली.

लष्करी दृष्टिकोनातून पाहिले असता, शिवाजी महाराजांनी स्वीकारलेली गनिमी काव्याची रणनीती ही केवळ युद्धतंत्र नव्हती, तर ती संसाधन-मर्यादितून निर्माण झालेली बुद्धिमान रणनिती होती. भूगोलाचा अचूक वापर, वेग, गोपनीयता आणि स्थानिक पाठिंबा यांच्या जोरावर त्यांनी बलाढ्य सैन्यांना पराभूत केले. मात्र महत्त्वाचे म्हणजे, युद्धातील नैतिकता त्यांनी कधीही सोडली नाही. स्त्रिया, मुले, वृद्ध आणि धर्मस्थळे यांना अभय देण्याची त्यांची भूमिका आधुनिक आंतरराष्ट्रीय मानवीय कायद्यांच्या तत्त्वांशी सुसंगत वाटते.

शिवाजी महाराजांचे प्रशासन हा त्यांच्या अभ्यासाचा अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. अष्टप्रधान मंडळाच्या माध्यमातून त्यांनी कारभाराचे विकेंद्रीकरण केले. पंतप्रधान, अमात्य, सुमंत, सचिव, सेनापती, न्यायाधीश, पंडितराव यांसारखी पदे निर्माण करून त्यांनी कार्यविभागणी व उत्तरदायित्व निश्चित केले. महसूल व्यवस्था शेतकरीकेंद्रित होती. जमिनीचे मोजमाप, पीकपद्धतीनुसार कर आकारणी आणि आपत्तीच्या काळात सवलती देणे ही धोरणे लोककल्याणकारी राज्याची लक्षणे मानली जातात.

धर्मनिरपेक्षतेच्या संदर्भात शिवाजी महाराजांचे स्थान विशेष आहे. त्यांच्या काळात धर्माधारित संघर्ष सामान्य होते, तरीही त्यांनी धार्मिक सहिष्णुतेची भूमिका घेतली. मशिदींचे संरक्षण, कुराणाचा सन्मान आणि मुस्लिम अधिकाऱ्यांना महत्त्वाची पदे देणे यावरून त्यांची भूमिका स्पष्ट होते. त्यामुळे शिवाजी महाराजांचे स्वराज्य हे धर्माधिष्ठित नसून नैतिक अधिष्ठान असलेले राज्य होते, असे आधुनिक इतिहासलेखन मानते.

स्त्रीसन्मानाच्या दृष्टीने शिवाजी महाराजांचा दृष्टिकोन त्यांच्या काळाच्या खूप पुढचा होता. इतिहासकारांच्या नोंदींनुसार, स्त्रीवर अत्याचार करणाऱ्यांना कठोर शिक्षा देण्यात येत असे. युद्धात जिंकलेल्या स्त्रियांना सन्मानाने परत पाठवले जाई. ही भूमिका तत्कालीन सामंती मानसिकतेच्या पूर्ण विरोधात होती. त्यामुळे शिवाजी महाराजांना स्त्रीसन्मानाचे आद्य पुरस्कर्ते मानले जाते.

राज्याभिषेक हा शिवाजी महाराजांच्या जीवनातील एक निर्णायक टप्पा होता. तो केवळ धार्मिक विधी नव्हता, तर सार्वभौम भारतीय राज्याची औपचारिक घोषणा होती. परकीय सत्तांच्या छायेतून बाहेर पडून स्वराज्याला वैधता देणारा हा क्षण होता. राज्याभिषेकानंतर स्वराज्याची प्रशासकीय रचना अधिक सुसंगत आणि संस्थात्मक झाली.

शिवाजी महाराजांच्या नेतृत्वाचे आकलन केवळ युद्ध आणि प्रशासनापुरते मर्यादित ठेवणे अपुरे ठरेल. त्यांच्या राज्यकारभाराचा एक अत्यंत महत्त्वाचा पैलू म्हणजे कूटनीती. सतराव्या शतकातील भारतीय राजकारण हे सतत बदलणाऱ्या सत्ता-समीकरणांनी व्यापलेले होते. मुघल, आदिलशाही, कुतुबशाही, स्थानिक सरदार आणि परकीय व्यापारी शक्ती यांच्यातील संबंध गुंतागुंतीचे होते. अशा परिस्थितीत शिवाजी महाराजांनी संघर्ष, तह, संधी आणि प्रतिकार यांचा समतोल साधत स्वराज्याचे हित जपले. आधुनिक आंतरराष्ट्रीय संबंध सिद्धांतात ज्याला 'रियलपोलिटिक' म्हटले जाते, त्याचे आद्य स्वरूप त्यांच्या धोरणांत आढळते.

महाराजांनी शत्रूशीही गरज पडल्यास तह केले, परंतु स्वराज्याच्या स्वायत्ततेवर कधीही तडजोड केली नाही. आग्रा भेटीसारख्या प्रसंगात त्यांची राजकीय सूक्ष्मदृष्टी आणि मानसिक धैर्य स्पष्टपणे दिसून येते. इतिहासकारांच्या मते, आग्र्यातील कैदेतून सुटका ही केवळ धाडसी पलायन नव्हते, तर मुघल सत्तेच्या नैतिक व राजकीय मर्यादांचे भान देणारा प्रसंग होता. या घटनेनंतर शिवाजी महाराजांची प्रतिमा केवळ प्रादेशिक राजापेक्षा व्यापक बनली.

मराठा साम्राज्याचा विस्तार हा शिवाजी महाराजांच्या वैचारिक वारशाचा परिणाम होता. त्यांनी निर्माण केलेली प्रशासनिक चौकट, लष्करी शिस्त आणि लोकाभिमुख धोरणे यांमुळे पुढील पिढ्यांना साम्राज्य विस्ताराची दिशा मिळाली. छत्रपती संभाजी महाराज, राजाराम महाराज आणि पुढे पेशवाई काळातील नेतृत्वाने शिवाजी महाराजांच्या संकल्पनांना पुढे नेले. तथापि, इतिहासकार हेही अधोरेखित करतात की शिवाजी महाराजांचे वैयक्तिक नेतृत्व आणि नैतिक अधिष्ठान हे अद्वितीय होते, ज्याची पुनरावृत्ती पुढील काळात तशीच्या तशी झाली नाही.

ब्रिटिश कालखंडात शिवाजी महाराजांची प्रतिमा नव्याने घडवली गेली. औपनिवेशिक इतिहासलेखनात सुरुवातीला त्यांना बंडखोर सरदार म्हणून दाखवण्याचा प्रयत्न झाला. मात्र भारतीय राष्ट्रवादी इतिहासकारांनी या दृष्टिकोनाला आव्हान दिले. लोकमान्य टिळकांनी शिवाजी जयंती आणि गणेशोत्सव सार्वजनिक करून शिवाजी महाराजांना राष्ट्रीय प्रेरणास्थान बनवले. विनायक दामोदर सावरकर, महात्मा फुले, राजाराम मोहन रॉय यांसारख्या विचारवंतांनी शिवाजी महाराजांच्या स्वराज्यसंकल्पनेला आधुनिक स्वातंत्र्य चळवळीशी जोडले.

आधुनिक भारतीय राष्ट्रवादाच्या अभ्यासात शिवाजी महाराजांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांच्या स्वराज्याची संकल्पना ही केवळ राजकीय स्वातंत्र्यापुरती मर्यादित नव्हती, तर ती सांस्कृतिक, सामाजिक आणि नैतिक स्वातंत्र्याशी जोडलेली होती.

ब्रिटिश सत्तेविरोधातील लढ्यात स्वराज्य हा शब्द पुन्हा केंद्रस्थानी आला, याचे मूळ शिवाजी महाराजांच्या विचारांत आढळते. त्यामुळेच त्यांना भारतीय राष्ट्रवादाचे आद्य प्रतीक मानले जाते.

शिवाजी महाराजांचा धर्मविषयक दृष्टिकोन आधुनिक भारतासाठी विशेष संदर्भात्मक ठरतो. आजच्या बहुधर्मीय, बहुसांस्कृतिक समाजात धार्मिक सहिष्णुता आणि परस्पर आदर ही मूल्ये अत्यंत आवश्यक आहेत. शिवाजी महाराजांनी आपल्या राज्यकारभारातून ही मूल्ये प्रत्यक्षात उतरवली. त्यांच्या काळातील राजकीय वास्तव पाहता ही भूमिका अधिकच महत्त्वाची ठरते. म्हणूनच आधुनिक राज्यशास्त्रात त्यांना 'सर्वसमावेशक शासक' म्हणून पाहिले जाते.

स्त्रीसन्मानाच्या संदर्भात शिवाजी महाराजांचे विचार आजच्या लिंगसमतेच्या चर्चेतही मार्गदर्शक ठरतात. स्त्रीला केवळ संरक्षण नव्हे, तर सन्मान देण्याची त्यांची भूमिका सामाजिक परिवर्तनाची बीजे पेरणारी होती. आधुनिक स्त्रीवादी अभ्यासकांच्या मते, शिवाजी महाराजांची भूमिका ही तत्कालीन पितृसत्ताक व्यवस्थेच्या चौकटीत राहूनही प्रगत होती.

प्रशासनशास्त्राच्या दृष्टीने शिवाजी महाराजांचे राज्य हे कल्याणकारी राज्याच्या प्राथमिक संकल्पनेशी सुसंगत वाटते. महसूल सवलती, आपत्ती व्यवस्थापन, न्याय्य करप्रणाली आणि लोकाभिमुख न्यायव्यवस्था ही वैशिष्ट्ये आधुनिक कल्याणकारी राज्याच्या मूलतत्त्वांशी जुळणारी आहेत. त्यामुळे शिवाजी महाराजांचे राज्य हे केवळ ऐतिहासिक नव्हे, तर सैद्धांतिक अभ्यासासाठीही महत्त्वाचे ठरते.

आजच्या भारतात शिवाजी महाराजांचे स्मरण अनेकदा भावनिक किंवा राजकीय पातळीवर मर्यादित राहते. मात्र शैक्षणिक दृष्टीने पाहिले असता त्यांच्या विचारांचा सखोल अभ्यास करण्याची गरज आहे. अभ्यासक्रम, संशोधन आणि सार्वजनिक चर्चांमध्ये शिवाजी महाराजांना केवळ योद्धा म्हणून नव्हे, तर राज्यसंस्थापक, प्रशासक आणि सामाजिक सुधारक म्हणून मांडणे आवश्यक आहे. यामुळे इतिहासाचे अधिक समतोल आणि वैज्ञानिक आकलन विकसित होईल.

जागतिक इतिहासाच्या संदर्भात पाहिले असता, शिवाजी महाराजांची तुलना युरोपमधील राष्ट्रनिर्मात्यांशी करता येते. त्यांनी उभारलेले स्वराज्य हे स्थानिक परिस्थितीतून उगम पावलेले असले तरी त्यातील मूल्ये सार्वकालिक आहेत. स्वातंत्र्य, न्याय, लोककल्याण आणि नैतिक नेतृत्व ही मूल्ये कोणत्याही काळात आणि कोणत्याही समाजात उपयुक्त ठरतात.

समारोप करताना असे म्हणता येईल की छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ मराठा इतिहासाचे नव्हे, तर संपूर्ण भारतीय इतिहासाचे केंद्रीय व्यक्तिमत्त्व आहेत. त्यांच्या स्वराज्याची संकल्पना ही आधुनिक भारतीय राज्यव्यवस्थेची वैचारिक पूर्वपीठिका ठरते. १९ फेब्रुवारी रोजी साजरी होणारी शिवजयंती ही केवळ गौरवाचा उत्सव नसून आत्मपरीक्षणाची संधी आहे. त्यांच्या विचारांकडे केवळ अभिमानाने नव्हे, तर अभ्यासपूर्ण दृष्टीने पाहिले तरच आपण त्यांच्या वारशाशी प्रामाणिक राहू शकतो. शिवाजी महाराजांचा वारसा म्हणजे तलवारीचा नव्हे, तर विचारांचा; सत्तेचा नव्हे, तर सेवेचा; विजयाचा नव्हे, तर मूल्यांचा वारसा आहे. आधुनिक भारताच्या लोकशाही, धर्मनिरपेक्षता आणि सामाजिक न्यायाच्या संकल्पनांत त्यांच्या स्वराज्याचा प्रतिध्वनी ऐकू येतो. म्हणूनच शिवाजी महाराज इतिहासात बंदिस्त न राहता आजही वर्तमानाशी संवाद साधतात आणि भविष्याला दिशा देतात.

**-डॉ. राजेंद्र बगाटे**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

# कुळवाडीभूषण छत्रपती शिवराय चरित्रातून सर्वगुणसंपन्न भारतीय घडतीलच अशी खात्री !

१९ फेब्रुवारी १६३० शिवनेरी किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्म झाला.त्यांच्या वडिलांचे नाव शहाजीराजे भोसले तर आईचे नाव राजमाता माँ. जिजाऊ होते.पहिल्या छत्रपती संभाजी महाराज नंतर झालेले चारही अपत्य वारली होती,त्यानंतरचे हे सहावे अपत्य होय.त्याकाळात राजेशाही व्यवस्था होती. निजामशाही,आदिलशाही,कुतुबशाही यांचे राज्य होते.यांच्यासाठी लढणारे अनेक मराठे सरदार घराणे होते.यात भोसले,जाधव, मोरे,गायकवाड,घोरपडे असे घराणे होते.जे शूरवीर होते.या राजेशाहीत अनेकदा आपसांत युद्ध होत असे.यात अनेक सरदार यांना युद्धात कामी यावे लागत असे.किरकोळ कारणावरून माहेर,सासरची आणि इतर नातेवाईक मंडळी मारली जात.यावर उपाय म्हणून स्वराज्य असावं असा विचार करून त्यादृष्टीचा विचार सत्यात आणण्यासाठी प्रयत्न केले गेले.इथे आजपर्यंत राजा हा राणीच्या पोटातून जन्म घेत असे,त्यालाच राजा होता येत असे.इथे मात्र रयतेच्या राज्यासाठी एका सरदारपुत्राला 'राजा' १)बालपण:- मातीचे किल्ले बनवणे, लपंडाव,चेंडू भवरा उडविणे,घोडे हत्ती स्वार होणे असे खेल सवंगडीसह खेळत.कुस्ती, दांडपट्टा,तलवार चालविणे याचे शिक्षण घेत होते.बाल शिवबाने मराठी,हिंदी,उर्दू, फार्सी,संस्कृत,तेलगू या सहा भाषा शिकून घेतल्या.यातून आपण बोध घेऊ असा विश्वास वाटतो.इ. स.१६४२ ला शहाजीराजे भोसले यांनी शिवबा,राजमाता माँ.जिजाऊ आणि निवडक सरदार यांना पुणे जहागिरदारीची जबाबदारी सांभाळण्यासाठी बंगळुरूहुन पाठविले.शहाजीराजे हे शूरवीर सरदार होते,त्यांना आदिलशाहीने 'सरलष्कर' हा किताब दिला होता.पुणे त्याकाळात आदिलशाही सरदार मुरारजगदेव याने शापितभूमी जाहीर करून पहार रोवून त्यावर फाटकी चप्पल,झाडू लटकविला होता.त्याच ठिकाणी राजमाता माँसाहेब जिजाऊ आणि शिवबानी वस्ती करून लालमहाल बांधला. शापितभूमीला नंदनवन बनविले. शेतकऱ्यांना विश्वास देवून त्यांच्या सोयीसाठी,शेतीसाठी पुनवडी,आंबवडी हे धरणे बांधली,बियाणे सह इतर मदत केली.खेड,शिवापूर,पाषाण,जिजापूर या बाजारपेठ निर्माण केल्या.शिवबा मावळ खोऱ्यात सवंगड्यासह फिरत, त्यांच्या घरच्या सोबतच कांदा भाकरी खात.यातून शिवबांच्याबद्दल मावळात आपुलकी, विश्वास,जिव्हाळा, प्रेम रयतेच्या मनात निर्माण झाले.अशातच शिवबानं १६४५ ला रायरेश्वराच्या देवालयात निवडक मावळ्यांसह स्वराज्य स्थापन करण्याची निर्धारपूर्वक शपथ घेतली.ती पूर्ण करण्यासाठी सतत प्रयत्न करत राहिले.

२)मुरुंबदेवाचा डोंगर :-स्वराज्य निर्माण करण्यासाठी पाऊल टाकले यात तोरणा किल्ला जिंकून घेतला. या किल्ल्याला लागूनच मुरुंबदेवाचा डोंगर होता,त्याठिकाणी खोदकाम चालू केले होते.त्यावेळी तेथे खोदकाम करतांना सुवर्ण मुद्रांनी भरलेल्या घागरी सापडल्या आणि सोबतच काही सोन्याच्या देवी देवतांच्या मुर्त्या सापडल्या.त्यासर्व घागरी आणि मुर्त्या मजुरांनी प्रामाणिकपणे शिवबाकडे सुपूर्द केल्या.सुवर्ण मुद्रांचा तर वापर स्वराज्यासाठी करायचे ठरले पण देवी देवतांच्या मुर्त्यांचे काय करावे?त्यावेळी रयतेची सेवा,त्यांनी सुखी करणे आणि रयतेचे राज्य उभे करणे अतिगरजेचे त्यामुळे त्या मुर्त्या वितळून त्यांचा विनियोग स्वराज्याच्या खजिन्यात करण्यात आला.तसेच सुरतेच्या छाप्यातील मौल्यवान वस्तू तसेच बोटभर कापड सुद्धा महाराजांनी स्वतः साठी घेतले नाही,ते राज्याच्या खजिन्यात जमा केले.ही बाब आज आम्हांला राजमाता माँ जिजाऊ शिवरायचरित्र,इतिहास यातून शिकण्यासारखी आहे.आज अनेक धार्मिक स्थळी करोडो रुपयाची संपत्ती पडून आहे, दरवाजे उघडले जाऊ शकत नाही आणि दुसरीकडे जिवंत माणसे,शेतकरी सोयी सुविधा पासून वंचित आहेत, कर्ज,उपासमार याने मृत्यू पावत आहेत. शिवाजी महाराजांनी मनुस्मृतीने सांगितलेली सिंधूबंदी झुगारली.आरमारतळ उभारले.जलप्रवास करून जलदुर्ग बांधले.महाराजाकडे ३०० जहाजे होती. पेण येथे जहाज बांधणी कारखाना,कुडाळ येथे मिठागर उभारले. तसेच बजाजी निंबाळकर आणि नेताजी पालकर हे पुन्हा स्वधर्मात येण्याचा प्रयत्न करत होते.त्यावेळी धाडस करून त्यांच्याशी सोयरीक करून त्यांना पुन्हा स्वधर्मात घेतले. त्यांना नातेवाईक बनविले.

३)निष्ठावंत मावळे :- स्वातंत्र्य,समता, बंधुता,न्याय यांवर आधारित रयतेचे राज्य निर्माण करण्यासाठी अठरापगड बहुजन समाजातील मावळे यांनी सर्वस्व अर्पण केले.शिवबानं सुद्धा कर्तृत्व पाहून शौर्य, योग्यतेनुसार जबाबदारी दिली.यात रायगडाचा पहिला किल्लेदार रायनाथ महार होता.याचबरोबर १२ शूरवीर महार सैनिकांना सरदारकी दिली.रामोशी जातीतील बहिर्जी नाईक यांस गुप्तहेर खातेप्रमुख केले.तर कोळी जातीतील मायनाक भंडारी यांस आरमाराचे प्रमुख केले. मेहतर जातीतील मदारी यास आपला विश्वासू सेवक बनवले. लोहार जातीतील संभाजी कावजी कोंढाळकर,न्हावी जातीतील जिवाजी महाले,शिवा काशीद हे अंगरक्षकात होते.तर सरसेनापती नूरखान, तोफखानाप्रमुख इब्राहिम खान,वकील काझी हैदर याचं बरोबर तानाजी मालुसरे, बाजीप्रभू देशपांडे, येसाजी कंक,सूर्याजी पिसाळ, मुरारबाजी,फिरंगोजी नरसाळा,असे अनेक शूरवीर सरदार होते. यातून कोणतीही जात,धर्म असो, फक्त आणि फक्त विश्वसनियता,शूरवीरता यांवर जबाबदारी दिली जात असे.याची आम्हाला जाणीव होते. ही बाब वर्तमानकालीन राजकारणात, प्रशासनात मार्गदर्शक आहेच.आग्रा कैदेतून पसार होत असताना हिरोजी फर्जंद यांने शिवरायांचे सोंग घेतले आणि मदारी मेहतर यांनी सेवक म्हणून शिवरायांचे सोंग घेतलेल्या हिरोजीचे पाय चेपत बसला.जीव धोक्यात घालून हे केले.बातमी उघड झाल्यावर मृत्यूदंड माहीत होता.पन निष्ठा कायम ठेवून मृत्यू स्वीकारला.पन्हाळा येथून वेढ्यातून निसटून जातांना शिवा काशीद ने शिवरायांचे कपडे,टोप घालून विशाळगडच्या दुसऱ्या बाजूला पसार झाले.पाठलागावर आलेल्या सैनिकांनी पकडून मृत्यूदंड दिला.हसत हसत 'रयतेच्या राजासाठी' स्वीकार केला.तानाजी मालुसरे मुलाच्या लग्नाचे निमंत्रण देण्यासाठी आल्यावर, जिजाऊ -शिवबा चर्चा ऐकून 'आधी लग्न कोंढाण्याचे नंतर रायबाचे' स्वतः जबाबदारी घेऊन लढताना किल्ला जिंकतात पन कामी येतात.आज घरचा,पाहुण्यांचा साधा एखादा छोटा कार्यक्रम असला तरी आम्ही बहानेबाजी करून नेमून दिलेले काम पुढे ढकलतो, टाळतो.विचार करून वर्तणूक करावी लागेलच. पुढे माँसाहेब स्वतः उमरठे गावी रायबाच्या लग्नाला हजर राहतात.कण्हेरगड युद्धात रामजी पांगेरा या शहीद सैनिकाचे वडिल नियमानुसार देय आर्थिक मदत स्वीकारत नाही. त्याऐवजी दुसरा मुलगा स्वराज्यासाठी सैनिक म्हणून घेऊन जा अशी अट घालतात.सर्वच सरदार,सैनिकांनी निष्ठेने राज्य वाढविले.मावळे म्हणून किंवा विचारांचे वारसदार म्हणून आम्ही छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाचा कर्तृत्ववाचा अंश आमच्यात आहे का नाही याचा विचार करून वागणे ठेवूया!

४)शेतकरीहिताचे धोरण:-

राष्ट्रपिता महात्मा जोतीराव फुले शिवरायांना कुळवाडीभूषण बहुजन प्रतिपालक ही उपाधी देतात. शिवरायांनी राज्यातील पूर्वीचे ४९ प्रकारचे विविध कर रद्द करून एकच कर ठेवला होता,तो पिकाच्या उत्पन्न आधारित कर.त्यासंदर्भात आपणांस २३ऑक्टोबर १६६२ चे सर्जेराव जेधे ना पाठविलेले पत्र,१९ मे १६७३ चे पत्र यांतील नोंदी,सूचना दिल्या. त्यात १.राज्यात दारू,अंमली पदार्थ,नर्तकी यावर बंदी होती.काटेकोरपणे पालन करावे लागे.आज सरकारने बंदी घालून अंमली पदार्थ -गुटखा विक्री,खरेदी मोठ्या प्रमाणात चालू आहे.दारूच्या नशेत तरुण पिढी यातून बरबाद होत आहे.कॅन्सर,अटॅक,लिव्हर दोष सारखे आजार होत आहेत.२.सैनिकाना सक्त आदेश होते की, शेतकऱ्याच्या भाजीच्या देठाला ही हात लावू नका,रोख देवून जिन्नस घेणे,उभ्या पिकांतून घोडे घालू नये. रात्रीच्या वेळी तेलवाती विझून झोपा. आजच्या घडीला शेतकऱ्यांच्या कोणत्याच पिकाला हमीभाव नाही, ठरविला तरी त्यानुसार खरेदी होत नाही,अडवणूक होते. उत्पादनखर्च ही निघत नाही.अनेकवेळा कुचेष्टा,आज शासक शिव्या देवून अपमानित केले जाते.कर्ज फिटत नसल्याने, पर्याय नसल्याने शेतकरी आत्महत्या होत आहे.३) सर्व शेतजमिनी मोजणी करून दिल्या.शेतकऱ्यांना बियाणे, बैलजोडी, पाण्याची सोय,म्हणून धरणे,तलाव बांधले. पाणी आडवा-पाणीसाठा वाढवा.रायगडावर असणारी शिवकालीन पाणी योजना त्याचा एक नमुना आहे.आज गावोगावी पिण्याच्या पाण्यासाठी होणारी भटकंती,भांडण, सरकारी योजनांचे अंमल करण्यात आणि रयतेचे हाल बघून मन दुःखी होते.४) शिवरायांनी गरजेनुसार कर्जवाटप केले. तवानगी आली की वसुली करावी,तगादा करू नये. संत तुकाराम महाराज यांनी शेतकऱ्यांचे कर्जमाफी करून खातेवाह्या इंद्रायणीत बुडविल्या होत्या. हा आदर्श ठेवून दुष्काळी परिस्थितीत शेतकरी कर्जमुक्त केले.

५) महावृक्ष ,फळझाडे तोडू नयेत असा दंडक आणि झाडे लावण्यासाठी प्रोत्साहन दिले.

'वृक्ष वल्ली आम्हा सोयरे वनचरे' या संत तुकाराम महाराजांच्या अभंगाची अंमलबजावणी शिवाजी महाराज करत. आज आम्ही फक्त भजनात,कीर्तनात अभंग कानाने ऐकतो आणि सोडून देतो.त्यामुळे आमची ही अवस्था आहे,त्यासाठी ते अभंग आम्ही समजून तसे वागलो,जगलो पाहिजे.

५) व्यवस्थापन आणि प्रभावीअंमल:-

शिवरायांनी अन्यायकारक असणारी वतनदारी पध्दत बंद केली.तसेच पगारी सैनिक नेमले.त्यांचे वेतन हे योग्य आणि वेळेवर देण्याची चोख व्यवस्था केली.शहीद सैनिक वारस यांना आर्थिक मदत,तसेच यांना निवृत्तीवेतन देत. सैनिकांवर नजर ठेवण्यासाठी महाराज स्वतः अचानक छावण्याना भेटी देत.किल्ला जिंकला की त्याची चोख बंदोबस्त करून व्यवस्था करत.जवळपास ३०० किल्ले होते.पन कोणत्याच किल्ला घेतला म्हणून अभिषेक,मुहूर्त, सत्यनारायण,वास्तूशांती

केली नाही.अनेक मोहिमा या अमावास्या रात्रीच केल्या. मुहूर्त न पाहता गनिमीकावा, युद्धनीतीने कार्यवाही केली. आम्ही तर वारस म्हणून घेणारे किल्यावर जात नाहीत. गेल्यावर नीट राहत नाही,तिथे स्वतः चे नाव टाकायचा प्रयत्न करतो. आज आम्ही चारधाम,इतर देवाला जातो हरकत नाही पन तसेच दरवर्षी किमान ५ किल्ले तरी सहकुटुंब उघड्या डोळ्यांनी पहा. मुलांना एक ऊर्जा,प्रेरणा निश्चित मिळेल.त्या गडाच्या मातीचा गंध, सहवास आमच्यात संचारून त्या प्रमाणे वागण्याचा प्रयत्न होईल. प्रतापगडाच्या पराक्रमात नीती जी गनिमी कावा चा भाग होती. अफजलखान यांस केलेल्या पत्रव्यवहाराची भाषा,केलेली सैनिकी पूर्वतयारी,(मोडेन पण वाकणार नाही,अशी भूमिका न घेता वास्तव जाण) त्यासोबतच प्रत्यक्ष भेटीतील चपळाई यातून अफजलखान पराभूत केला.सोबतच सय्यद बंडा आणि कृष्णा कुलकर्णी यांनाही संपविले.

होते जीवाजी म्हणून वाचले शिवाजी

ही म्हण रूढ झाली.जगद्गुरु संत तुकाराम महाराजांचा आदर्श समोर ठेवून, लाख ब्रह्महत्या न असे पातक पाहता मुख एक विठोबाचे'!

कृष्णा कुलकर्णी याने केलेला घाव जो शिवरायांच्या डोक्यावर झालेला एकमेव घाव होता.कारण वकीली सोडून घाव करील असे वाटले नव्हते,असो. अफजलखानाच्या मृतदेहाच योग्य त्या इतमामात दफन केले. थडगे, त्यावर मुजावर आणि २ मन तेल याची सोय केली.

(६)सहिष्णू धार्मिक धोरण:-

स्वराज्यात सर्व धर्माचा आदर केला जात असे. त्यामुळे कुराणची सापडलेली प्रत असो,किंवा रायगडावर असलेली मस्जिद असो.तसेच गडावर असणारे मंदिर असो. त्याबाबत समता होती. राज्यातील भिक्षुकी करणाऱ्या पुरोहित बामनांनी 'शिवराय' यांना शूद्र ठरवून राज्याभिषेक नाकारला,त्यावेळी शिवबानं काशीहून गागाभट याला पाचारण केले.भरपूर संपत्ती देवून राज्याभिषेक करवून घेतला. तसेच राजव्यवहार भाषकोश बनवला.तसेच इतिहास लेखनाची जबाबदारी परमानंद यांस सांगून 'शिवभारत' लिहून घेतले.संत तुकाराम महाराजांच्या कीर्तनात शिवराय येत,सल्ला, मार्गदर्शन घेत.सैनिकांना मार्गदर्शनासाठी संत तुकाराम महाराज यांनी गाथेत पाईकांचे अभंग लिहिले. तसेच भेटीप्रसंगीचा अभंग,

आम्ही तेणे सुखी।
म्हणा विठ्ठल विठ्ठल मुखी।
कंठी मिरवा तुळशी।
व्रत करा एकादशी।।
तुमचे येर वित्त धन।
ते मज मृत्तिकेसमान।।
म्हणवा हरीचे दास।
तुका म्हणे मज हे आस।।

अशा कर्तृत्ववान महान रयतेच्या राजाचे ३ एप्रिल १६८० ला रायगडावर निर्वाण झाले.

अशा महान शिवबांचा इतिहास जो पेशवाईत बंदी घातला.ते शिवराय आम्हांला फक्त आणि फक्त महात्मा जोतीराव फुले यांच्यामूळे माहीत झाले.कारण रायगडावरील समाधी शोधून, तिची दुरुस्ती करून पुणे येथे १९ फेब्रुवारी १८७९ ला १० दिवसांचा शिवजयंती उत्सव सुरू केला.त्याची नोंद पुणे पोलीस स्टेशन मध्ये आहे,बरं! राष्ट्रपिता, शिवशाहीर महात्मा फुले यांनी शिवचरित्रपर ९०० ओळीचा पहिला पोवाडा लिहिला.त्यांना भारतरत्न नाही,मात्र शिवराय जिजाऊ यांची बदनामी करणारे ब मो पुरंदरे यांना महाराष्ट्रभूषण, पद्मश्री.करोडोची मदत. छत्रपती शिवाजी महाराजांचे कर्तृत्व सांगताना,बाळ ठाकरे यांचे वडील प्रबोधनकार ठाकरे म्हणतात,

जय जिजाऊ जय शिवराय जय ज्योती जय क्रांती!

**लेखन**
**-मा.रामेश्वर त्रिमुखे,जालना.०९४२०७०५६५३.**
**(व्याख्याते तथा प्रबोधनकार.)**

# तहसीलदारांचा अजब कारभार!

## रस्ता मोकळा करण्याऐवजी शेतकऱ्याला दिला कोर्टाचा सल्ला; गंगापुरात संताप

**आत्ताच एक्सप्रेस**
**गंगापूर (प्रतिनिधी)** सर्वसामान्यांचे प्रश्न सुटावेत म्हणून ज्या महसूल विभागाकडे शेतकरी आशेने पाहतात, तिथेच आता शेतकऱ्यांची बोळवण केली जात असल्याचा धक्कादायक प्रकार गंगापूरमध्ये समोर आला आहे. मौजे रांजणगाव नरहरी येथील शेतकरी बाबासाहेब रंगनाथ भोसले यांचा हक्काचा रस्ता अडवलेला असताना, तो मोकळा करून देण्याऐवजी तहसीलदार नवनाथ वगवाड यांनी शेतकऱ्याला कायदेशीर दाव्याचा तांत्रिक सल्ला देऊन आपली जबाबदारी झटकल्याचा आरोप होत आहे.

रांजणगाव नरहरी येथील गट क्र. २१३ मधील शेत रस्ता आजूबाजूच्या शेतकऱ्यांनी बंद केला आहे. यासंदर्भात बाबासाहेब भोसले यांनी रस्ता मोकळा करून मिळण्यासाठी तहसीलदारांकडे रीतसर अर्ज केला होता. या प्रकरणाचा मांजरी



येथील मंडळ अधिकाऱ्यांनी १६/१२/२०२५ रोजी पंचनामाही केला होता. पंचनामा होऊनही रस्ता मोकळा करण्याचे आदेश देण्याऐवजी तहसीलदारांनी शेतकऱ्याला पत्राद्वारे नवीच 'दिशूलभूल' करणारी माहिती दिली.

### तहसीलदारांचा 'तांत्रिक' आडमुठेपणा

तहसीलदारांनी आपल्या पत्रात म्हटले आहे की, रस्ता अडविलेला असल्यास मामलेदार कोर्ट ॲक्ट १९०६ चे कलम ५ अन्वये किंवा नवीन रस्ता हवा असल्यास महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १४३ अन्वये रीतसर दावा दाखल करावा. वास्तविक पाहता, सरकारी रस्ता मोकळा करणे ही तहसीलदारांची प्राथमिक जबाबदारी असताना, अशिक्षित आणि सामान्य शेतकऱ्याला अशा कायद्याच्या कचाट्यात अडकवणे म्हणजे त्यांच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखेच आहे.

तहसीलदारांकडे न्याय मिळेल या आशेने आम्ही गेलो होतो, पण त्यांनी आम्हाला कोर्ट-कचेरीच्या फेऱ्यात अडकवले. जर सरकारी अधिकारीच अशी दिशाभूल करणार असतील, तर शेतकऱ्यांनी न्याय मागायचा कोणाकडे?

**- बाबासाहेब रंगनाथ भोसले**
**(पीडित शेतकरी)**

**शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप**

तहसीलदारांच्या या कार्यपद्धतीमुळे गंगापूर तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये प्रचंड नाराजी पसरली आहे. रस्ता मोकळा करण्याच्या अधिकाराचा वापर न करता, शेतकऱ्यांना जाणीवपूर्वक त्रास दिला जात असल्याची चर्चा आहे. या प्रकरणाची वरिष्ठ स्तरावर चौकशी होऊन संबंधित शेतकऱ्याला तात्काळ रस्ता मोकळा करून द्यावा, अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.

# गंगापूर येथे विधी व सेवा महाशिबीर

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/ जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, तालुका विधी सेवा समिती व गंगापूर तालुका वकील संघ यांच्या संयुक्त विद्यमाने शासकीय सेवा व योजनांचा महामेळावा शनिवारी (दि.१४) गंगापूर येथे पार पडला.

मेळाव्याचे उद्घाटन उच्च






न्यायालयाचे न्यायमूर्ती अभय वाघवसे यांनी केले.अध्यक्षस्थानी जिल्हा व सत्र न्यायालय तथा अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण गिरीश अग्रवाल हे होते. जिल्हा न्यायाधीश आर. डी. पाटील, तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष एस.बी. बहाळकर, उप विभागीय पोलीस अधिकारी निलेश पालवे आदी उपस्थित होते. धूत कन्या शाळा गंगापूर या प्रांगणात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

महाशिबिरात २०स्टॉल्स लावण्यात आले होते. त्यतून विविध शासकीय कार्यालयांमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती व सेवा उपलब्ध करण्यात आल्या. तसेच विविध सेवा व न्याय सहाय्याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात आले, अशी माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव तथा न्यायाधीश वैशाली फडणीस यांनी कळविले आहे.

# अनुसूचित जातीतील तरुणांसाठी सुवर्णसंधी!

## 'बार्टी' आणि "MCED' कडून मोफत तांत्रिक प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/ अनुसुचित जाती प्रवर्गातील युवक-युवतींना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी आणि त्यांना उद्योजक बनवण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे आणि महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (MCED) यांनी पुढाकार घेतला आहे.

या दोन्ही संस्थांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती संभाजीनगर येथे एक महिना व दोन महिने कालावधीच्या मोफत अनिवासी तांत्रिक उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश

या विशेष प्रशिक्षणाचा मुख्य हेतू अनुसूचित जाती प्रवर्गातील तरुणांना तंत्रशुद्ध प्रशिक्षण देऊन त्यांना स्वतःचा स्वयंरोजगार सुरू करण्यास सक्षम करणे किंवा तांत्रिक कौशल्याच्या जोरावर चांगला रोजगार मिळवून देणे हा आहे.

काय असेल प्रशिक्षणाचे स्वरूप?

हे प्रशिक्षण केवळ पुस्तकी नसून त्यात प्रॅक्टिकलसह तांत्रिक ज्ञानावर भर दिला जाणार आहे. प्रशिक्षणार्थींना खालील विषयांचे सखोल मार्गदर्शन तज्ज्ञांमार्फत दिले जाईल:

उद्योग उभारणी: नवीन उद्योग कसा सुरू करावा याची सविस्तर माहिती. शासकीय योजना: कर्जविषयक आणि अनुदान योजनांची माहिती.प्रकल्प अहवाल (Project Report): बँकांसाठी आवश्यक असणारे प्रकल्प अहवाल तयार करणे.व्यवस्थापन व विक्री: उद्योग व्यवस्थापन, विक्री कला आणि मार्केटिंगचे कौशल्य.कायदेशीर बाबी: कर कायदा, लायसन्स प्रक्रिया आणि उद्योगांना प्रत्यक्ष भेटी.

पात्रता आणि अटी

प्रशिक्षणासाठी उमेदवारांची निवड प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे केली जाईल. पात्रतेचे निकष खालीलप्रमाणे आहेत:

वय: १८ ते ४५ वर्षे.प्रवर्ग: उमेदवार अनुसूचित जाती प्रवर्गातील असावा. शिक्षण: १ महिना प्रशिक्षणासाठी किमान १० वी उत्तीर्ण; तर २ महिने प्रशिक्षणासाठी पदवीधर (Engineering, Polytechnic, MCA, BCA, MSc, BSc यांना प्राधान्य).रहिवासी: गेल्या १५ वर्षांपासून महाराष्ट्राचा रहिवासी असणे अनिवार्य आहे.

आवश्यक कागदपत्रे प्रवेश अर्जासोबत खालील कागदपत्रांच्या प्रती जोडणे आवश्यक आहे:आधार कार्ड व फोटो,जातीचा दाखला,अंतिम सत्र गुणपत्रिका (Marksheet),शाळा सोडल्याचा दाखला (TC),रहिवासी दाखला,इच्छुक उमेदवारांनी महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (MCED), जिल्हा कार्यालय, अ-३८, चखऊ रेल्वे स्टेशन परिसर, छत्रपती संभाजीनगर येथे संपर्क साधावा.अधिक माहितीसाठी खालील क्रमांकावर संपर्क करण्याचे आवाहन श्री. सुदाम थोटे (विभागीय अधिकारी, MCED) आणि श्री. योगेश सोनावणे (प्रकल्प अधिकारी, बार्टी) यांनी केले आहे:

### डॉ. प्रकाश पापडीवाल यांना 'जीवन गौरव' पुरस्कार प्रदान

छत्रपती संभाजीनगर: येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे वनस्पतीशास्त्र विभागाचे माजी प्राध्यापक डॉ. प्रकाश बाबूलाल पापडीवाल यांना 'सोसायटी ऑफ लाईफ सायन्सेस'तर्फे 'एस.एल.एस. लाईफ टाईम अचिव्हमेंट अवॉर्ड २०२६' देऊन सन्मानित करण्यात आले. वनस्पतीशास्त्र क्षेत्रातील त्यांचे दीर्घकालीन शैक्षणिक योगदान आणि उल्लेखनीय संशोधनासाठी हा गौरव करण्यात आला. प्राणीशास्त्र विभागात आयोजित राष्ट्रीय परिषदेत सोसायटीचे सरचिटणीस प्रा. शिवेश प्रताप सिंग यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

### जालना शिवजयंती निमित्त छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसराची आकर्षक विद्युत रोषणाई



**आत्ताच एक्सप्रेस**
**जालना/प्रतिनिधी**/जगभरात शिवजयंतीचा उत्साह असतानाच, जालना शहरातही शिवजन्मोत्सवाचा अभूतपूर्व उत्साह पाहायला मिळत आहे. येथील मुख्य चौकातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यासह संपूर्ण परिसराला अत्यंत आकर्षक आणि नेत्रदीपक अशा विद्युत रोषणाईने उजळवून टाकण्यात आले आहे.

**केशरी रंगाची झळाळी आणि विद्युत रोषणाई**

शिवजयंतीचे औचित्य साधून पुतळा परिसर आणि आसपासच्या इमारतींवर रंगीबेरंगी दिव्यांची आरास करण्यात आली आहे. विशेषतः भगव्या (केशरी) रंगाच्या विद्युत रोषणाईमुळे संपूर्ण परिसर शिवमय झाला आहे. ही रोषणाई पाहण्यासाठी आणि महाराजांच्या चरणी नतमस्तक होण्यासाठी शिवभक्तांनी मोठी गर्दी केली आहे.

शिवाजी पुतळा परिसर: विद्युत माळांच्या साह्याने करण्यात आलेली सजावट रात्रीच्या वेळी सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे.फोटोग्राफीचा आनंद: अनेक नागरिक आणि तरुण ही सजावट आपल्या मोबाईल कॅमेऱ्यात टिपताना दिसत आहेत.शिस्तबद्ध नियोजन: उत्सव समितीच्या वतीने अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने हा परिसर सजवण्यात आला आहे.

दरवर्षीप्रमाणे यावर्षीही जालना शहरात शिवजयंतीचा उत्साह मोठा आहे. विद्युत रोषणाईमुळे शहराच्या सौंदर्यात भर पडली असून वातावरण मंगलमय झाले आहे.

**- एक स्थानिक शिवभक्त**

या मनमोहक दृश्याची काही छायाचित्रे प्रसिद्ध छायाचित्रकार किरण खानापुरे यांनी आपल्या कॅमेऱ्यात टिपली असून, ती सध्या सोशल मीडियावर चांगलीच व्हायरल होत आहेत.

छायाचित्र: किरण खानापुरे

# शिवना नदी पात्रातून अवैध वाळू उपसा जोमात; महसूल विभागाचे अधिकारी 'कोमात'!

## वाळू माफियांनी लुटला शासनाचा लाखो रुपयांचा महसूल; प्रशासकीय आशीर्वादाने शिवना नदीची चाळण



**आत्ताच एक्सप्रेस**
**गंगापूर (प्रतिनिधी-सुभान शहा)** गंगापूर तालुक्यातील शिवना नदी पात्रातून मागील काही दिवसांपासून अवैध वाळू उपसा अत्यंत जोमाने सुरू असून, याकडे महसूल विभागाने जाणीवपूर्वक डोळेझाक केल्याचे चित्र दिसत आहे. वाळू माफियांच्या या उच्छादामुळे शासनाचा लाखो रुपयांचा महसूल पाण्यात जात असतानाही अधिकारी 'कोमात' का? असा संतप्त सवाल आता सर्वसामान्य नागरिक उपस्थित करत आहेत.

**पाणीटंचाईचे सावट, तरीही प्रशासन सुस्त!**

नदी पात्रातून मोठ्या प्रमाणावर अवैध उपसा होत असल्यामुळे भविष्यात शिवना नदीकाठच्या गावांना भीषण पाणीटंचाईचा सामना करावा लागण्याची दाट शक्यता आहे. पर्यावरणाचा ऱ्हास होत असूनही महसूल विभागाचे अधिकारी कारवाई करण्याचे धाडस दाखवत नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. 'सर्वसामान्यांना दिसणारा हा उपसा एसी गाड्यांतून फिरणाऱ्या अधिकाऱ्यांना का दिसत नाही?' असा रोकडा सवाल जनतेने विचारला आहे.

**प्रशासनाला जाग येणार का?**

महसूल विभागाने या प्रकरणाकडे वेळीच लक्ष देऊन कडक कारवाई करावी, अन्यथा भविष्यात शिवना नदीचे अस्तित्व धोक्यात येईल. आता जिल्हाधिकाऱ्यांनीच या प्रकरणात लक्ष घालून भ्रष्ट अधिकाऱ्यांवर आणि वाळू माफियांवर कारवाईचा बडगा उगारण्याची गरज आहे. सामान्य जनतेचे लक्ष आता महसूल विभागाच्या पुढच्या पाऊलाकडे लागले आहे.

**अधिकारी आणि वाळू माफियांचे 'साटंलोटं'?**

गंगापूर तालुक्यात अवैध वाळू उपशाने सीमा ओलांडली आहे. महसूल विभागाच्या काही वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आशीर्वादाने आणि वाळू माफियांच्या संगनमतानेच हा काळा बाजार जोरात सुरू असल्याची चर्चा आता जनमानसात रंगत आहे. लाखो रुपयांची महसूल बुडवून स्वतःची खिसे भरणाऱ्या या टोळीवर आळा बसणार की नाही?

### जालन्याचा झेंडा जेईई परीक्षेत उंचवला! आयन खंडेलवालचे ९९.०३ पर्सें टाईलसह दैदिप्यमान यश

**आत्ताच एक्सप्रेस**
**जालना/प्रतिनिधी**/नुकत्याच जाहीर झालेल्या जेईई (JEE) परीक्षेच्या निकालात जालना शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. शहरातील आर.पी. रोड भागातील रहिवासी आयन चेतन खंडेलवाल याने या अत्यंत कठीण समजल्या जाणाऱ्या परीक्षेत ९९.०३ पर्सेंटाईल गुण प्राप्त करून घवघवीत यश संपादन केले आहे. त्याच्या या यशामुळे संपूर्ण जालना जिल्ह्यातून त्याचे कौतुक होत आहे.आयन हा सामाजिक कार्यकर्ते चेतन खंडेलवाल यांचा मुलगा आहे. लहानपणापासूनच अभ्यासात अत्यंत हुशार असलेल्या



आयनने परीक्षेचा कोणताही ताण न घेता, अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने आपला अभ्यास पूर्ण केला. सातत्य आणि योग्य मार्गदर्शन असेल तर यश नक्कीच मिळते, हे त्याने आपल्या निकालातून सिद्ध केले आहे. त्याच्या या यशात त्याचे मार्गदर्शक अंकुश सोनवणे सरांचे मोठे योगदान असल्याचे सांगण्यात येत आहे.

आयनच्या या यशाची दखल घेत जालन्याचे माजी आमदार तथा भाजपा नेते कैलास गोरंटयाल यांनी बुधवारी सायंकाळी खंडेलवाल यांच्या निवासस्थानी प्रत्यक्ष भेट दिली. यावेळी त्यांनी आयनला पुष्पगुच्छ देऊन आणि मिठाई भरवून त्याचे मनापासून अभिनंदन केले.आयनने मिळवलेले हे यश...

**पुढील बातमी पान ४ वर..पहा..**

# लासूर स्टेशन येथील 'गीताबन कला महोत्सवात' ३६०० विद्यार्थ्यांचा महाकुंभ; तुर्काबाद जिल्हा परिषद शाळा सलग तिसऱ्यांदा 'उत्कृष्ट संघ'

**आत्ताच एक्सप्रेस**
**लासूर स्टेशन (प्रतिनिधी)** गंगापूर तालुक्यातील लासूर स्टेशन येथे आयोजित 'गीताबन कला महोत्सवा'त विद्यार्थ्यांचा अभूतपूर्व उत्साह पाहायला मिळाला. गंगापूर, खुलताबाद, वैजापूर आणि कन्नड या चार तालुक्यांतील २०० हून अधिक शाळांमधील तब्बल ३,६०० विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांचे सादरीकरण केले. या स्पर्धेत तुर्काबाद येथील पीएमश्री जिल्हा परिषद शाळेने सलग तिसऱ्या वर्षी 'उत्कृष्ट संघा'चा बहुमान पटकावून आपली मोहोर उमटवली आहे.

तीन दिवसीय सांस्कृतिक सोहळा

आमदार प्रशांत बंब यांच्या वाढदिवसानिमित्त आमदार बंब मित्रमंडळ (गंगापूर-खुलताबाद) आणि परिवर्तन प्रतिष्ठान (लासूर स्टेशन) यांच्या वतीने १५, १६ आणि १७ फेब्रुवारी दरम्यान या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना हक्काचे व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने आयोजित या महोत्सवाचे हे तिसरे वर्ष होते.

**११ कलाप्रकारांत १६३ पारितोषिकांचा वर्षाव**

या महोत्सवात प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक आणि महाविद्यालयीन अशा विविध गटांत स्पर्धा पार पडल्या. एकूण ११ कलाप्रकारांमध्ये १६३ पारितोषिके देण्यात आली. यामध्ये प्रामुख्याने खालील स्पर्धांचा समावेश होता:

नृत्य: वैयक्तिक नृत्य, समूह नृत्य,



लावणी, गोंधळ.

गायन: वैयक्तिक आणि समूह गायन, पोवाडा.

इतर: रांगोळी, चित्रकला, काव्यवाचन आणि वक्तृत्व स्पर्धा.

प्रत्येक गटात प्रथम, द्वितीय, तृतीय आणि दोन उत्तेजनार्थ अशा स्वरूपात रोख रक्कम, स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन विजेत्यांना गौरवण्यात आले.

तुर्काबाद शाळेची 'हॅट्ट्रिक'

स्पर्धेत तुर्काबाद येथील पीएमश्री जिल्हा परिषद शाळेच्या संघाने सर्व ११ कलाप्रकारांत सहभाग नोंदवत सर्वाधिक २१ पारितोषिके आपल्या नावावर केली. यामुळे या शाळेला 'छत्रपती संभाजीनगर ग्रामीण उत्कृष्ट संघ' म्हणून सलग तिसऱ्यांदा सन्मानित करण्यात आले. यासोबतच कन्नड, गवळीशिवरा आणि विटावा येथील शाळांनीही चुरशीची लढत देत घवघवीत यश संपादन केले.

या सोहळ्याला राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी हजेरी लावली, ज्यात शेषरावनाना जाधव (सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती), संगीता आमराव (जिल्हा परिषद सदस्या), रत्तन बत्तीसे, प्रतीक्षा कापसे कविता चव्हाण, अनिता खंडागळे (पंचायत समिती सदस्या), सावळीराम थोरात, संतोष जाधव, सुनील पाखरे, प्रकाश कोकरे,जयमाला वाघ, शीला गाढे (भाजप नेत्या), मीना पांडव (सरपंच) यशस्वीतेसाठी परिश्रम

हा भव्य महोत्सव यशस्वी करण्यासाठी संदीप गायकवाड, नितीन गायकवाड, शशिकांत सांगवीकर, भगवान गाडे, आनंद कांबळे, रवी इंगळे, संतोष काटखाय, शुभम मढिकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

लासूर स्टेशनचा हा परिसर तीन दिवस कला आणि संस्कृतीच्या रंगात न्हाऊन निघाला होता. ग्रामीण भागातील मुलांकडे असलेली जिद्द आणि कला या महोत्सवाच्या माध्यमातून पुन्हा एकदा जगासमोर आली आहे.

# पर्यावरण राजे ...

शिवाजी राजे खरे
बहु रत्नाची खाण
पर्यावरण महत्वाचे
त्याकाळी हो जाण

परसात लावा झाडे
रयतेला जीव प्राण
अकारण न वृक्षवध
घातली त्यांनी आण

आरमारास लाकूड
समूल्य देऊन आण
तोडू नका फलवृक्षा
करी प्रजा गुजराण

काठीही तोडो न द्या
जगणे होईल हैराण
आदेश महाराजांचा
जंगल ना हो वैराण

शतकेलोटली तरीही
आपण कसे अजाण
म्हणतो शिवबा भक्त
अंतःकरण का घाण

बळीराजास बहुमान
करी रयतेचे परित्राण
निसर्ग कृपा तुजवरी
खरे चामरशिरस्त्राण

शिवजन्मोत्सव सुखे
साजरे करता उधाण
एकतरी रोपटे जपूया
मनी ना यावे कुधाण

- हेमंत मुसरीफ पुणे .
९७३०३०६९९६

निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र
आत्ताच एक्सप्रेस

जालना गुरूवार, १९ फेब्रुवारी २०२६

पान नं.४

# 'शिवरायांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प करा' - महापौर वंदना मगरे यांचे आवाहन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (विशेष प्रतिनिधी)** छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ राजा नव्हते, तर ते महाराष्ट्राचे ऊर्जास्थान आहेत. आजच्या पिढीने केवळ उत्सवापुरते मर्यादित न राहता, शिवरायांच्या जाज्वल्य विचारांचा वारसा प्रत्यक्ष जीवनात उतरवण्याचा संकल्प करावा, असे ठाम प्रतिपादन जालन्याच्या महापौर वंदना मगरे यांनी केले.

**जालन्यात घुमला शिवशाहीचा जागर; शाहिरी कडाडली अन् अंगावर उमटले शहारे!**

छत्रपती शिवाजी महाराज जयंतीचे औचित्य साधून राज्याचे सांस्कृतिक कार्य संचालनालय आणि जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने १८ आणि १९ फेब्रुवारी २०२६ रोजी भव्य सांस्कृतिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्याच्या उद्घाटन प्रसंगी त्या बोलत होत्या.

**चिमुकल्या शिवरायांनी जिंकली मने!**

यावेळी उपमहापौर राजेश राऊत यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. पूर्वी बैलगाडीतून निघणाऱ्या मिरवणुका आज आधुनिक वाहनांपर्यंत पोहोचल्या आहेत, काळ बदलला तरी निष्ठा तीच आहे, असे ते म्हणाले. विशेषतः कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या चिमुकल्यांना शिवरायांच्या वेशभूषेत पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले. अशा संस्कारांतूनच उद्याची प्रबळ पिढी घडेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**'जागर शिवशाहीचा': टाऊन हॉल शिवमय!**

बुधवारी १८ फेब्रुवारी रोजी शाहीर अजिंक्य लिंगायत आणि त्यांच्या ११ सहकाऱ्यांनी सादर केलेल्या 'जागर शिवशाहीचा' या कार्यक्रमाने जालनेकरांच्या डोळ्यांचे पारणे फेडले.

प्रारंभ: पारंपारिक गोंधळाने आणि 'दार उघड बया आता दार उघड' या गीताने सभागृहात चैतन्य भरले.शिवपाळणा: शिवरायांच्या बाललीलांचे वर्णन करणाऱ्या 'गोविंद घ्या कोणी गोपाळ घ्या' या शिवपाळण्याने उपस्थितांचे मन हेलावले.



शिवराज्याभिषेक गीत: 'छत्रपती शिवाजी जाहले' या गीतावेळी शाहिरांचा बुलंद आवाज आणि वाद्यांच्या साथीने संपूर्ण टाऊन हॉल परिसर रोमांचक झाला.युद्धकला: विस्मृतीत चाललेल्या 'तुमडी' कलेसह सादर केलेली युद्धकला आणि लढतीची प्रात्यक्षिके पाहून प्रेक्षक थक्क झाले.

निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल यांनी या आयोजनामागची भूमिका स्पष्ट करताना सांगितले की, शिवरायांचा इतिहास आजच्या पिढीला प्रेरणा देण्यासाठी हा सांस्कृतिक सोहळा आयोजित केला आहे. याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त अर्जुन गिराम, उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे, मनिषा दांडगे, तहसीलदार छाया पवार यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

**उद्याची मेजवानी: 'शाहिरी शिवदर्शन'**

गुरुवारी, १९ फेब्रुवारी रोजी रात्री जालना टाऊन हॉल येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात आणखी एक मोठी पर्वणी असणार आहे. झी मराठी व कलर्स मराठी फेम प्रसिद्ध शाहीर रामानंद उगले, माधवी उगले-माळी आणि त्यांचे १६ सहकारी **'शाहिरी शिवदर्शन'** हा बहारदार कार्यक्रम सादर करणार आहेत. या कार्यक्रमाला जालनेकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.शाहिरी थाप आणि तुणतुण्याच्या सुराने अवघे जालना शिवमय.विस्मृतीत चाललेल्या 'तुमडी' कलेचे दर्शन.१९ फेब्रुवारीला शाहीर रामानंद उगले यांचा 'शाहिरी शिवदर्शन' सोहळा.

# 'घरकुल हीच खरी मूलभूत गरज'; ॲड. भास्कर मगरे यांचा निर्धार

शिवसंपर्क सामाजिक अभियानातून गाव-वाडी, वस्ती पिंजली; गोर-गरीबांना सरकारी अनुदान मिळवून देण्यात यश



**आत्ताच एक्सप्रेस**

**परतूर (प्रतिनिधी)** सामान्य माणसासाठी हक्काचे घर ही केवळ सोय नसून ती एक मूलभूत गरज आहे. भूमिहीन, बेघर आणि निराधार या घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी शिवसेना दलित आघाडी कटिबद्ध आहे, असे प्रतिपादन शिवसेना दलित आघाडीचे जालना जिल्हाप्रमुख ॲड. भास्कर मगरे यांनी केले.

परतूर येथे आयोजित 'भूमिहीन, बेघर, निराधार त्रिसूत्री कार्यक्रम' मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी त्यांनी शिवसंपर्क सामाजिक अभियानाच्या माध्यमातून जिल्ह्यातील वंचितांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून दिल्याचा दावा केला.

**गाव-वाडी आणि तांड्यांपर्यंत पोहोचले अभियान**

गेल्या अनेक वर्षांपासून शिवसेना दलित आघाडीच्या वतीने जालना जिल्ह्यात जनआंदोलन आणि रस्त्यावरचा संघर्ष सुरू आहे. जिल्हा शिवसंपर्क सामाजिक अभियानांतर्गत पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी जिल्ह्यातील प्रत्येक गाव, वाडी आणि तांडावस्ती पिंजून काढली आहे. या मोहिमेद्वारे उपेक्षित समाजातील खऱ्या वंचित घटकांचा शोध घेऊन, त्यांचे विहित नमुन्यात अर्ज भरून त्यांना शासकीय योजनांच्या प्रवाहात आणण्यात आघाडीला मोठे यश आले आहे.

विविध आवास योजनांचा लाभ मिळवून देण्याची मागणी

मेळाव्यानंतर उपविभागीय अधिकाऱ्यांशी चर्चा करून त्यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने खालील मुद्द्यांवर भर देण्यात आला.सर्वांसाठी घरे (२०२२-२४): केंद्र व राज्य शासनाच्या धोरणानुसार दलित, आदिवासी आणि वंचित घटकांना तात्काळ निवारा मिळावा.

योजनांची प्रभावी अंमलबजावणी: रमाई आवास, शबरी घरकुल, इंदिरा आवास, प्रधानमंत्री आवास, पारधी आवास आणि यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेतून लाभार्थ्यांना घरे मिळावीत.

**महाआवास अभियान:** महाराष्ट्र शासनाच्या 'ग्रामीण महाआवास' मोहिमेअंतर्गत जागेअभावी रखडलेली घरकुले प्राधान्य क्रमाने पूर्ण करावीत.

**निराधारांना हक्काचे मानधन**

केवळ घरांचा प्रश्नच नव्हे, तर वयोवृद्ध आणि निराधार व्यक्तींना मिळणारे मासिक अनुदान (मानधन) मंजूर करून घेण्यासाठी प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे. खऱ्या गरजूंना या योजनांचा लाभ मिळेपर्यंत हा लढा सुरूच राहील, असेही ॲड. मगरे यांनी यावेळी स्पष्ट केले.या मेळाव्याला मधुकर मोरे, बाळासाहेब भदर्गे, संभाजी पाटील यांच्यासह जिल्ह्यातील बेघर आणि निराधार नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. जालना जिल्ह्यात आता तालुकास्तरावर अशा मेळाव्यांचे आयोजन करून वंचितांना न्याय दिला जाणार असल्याचे सांगण्यात आले.

# रायगव्हाण जिल्हा परिषद शाळेच्या व्यवस्थापन समिती अध्यक्षपदी अमोल आगळे; उपाध्यक्षपदी संतोष पोटे यांची बिनविरोध निवड

**आत्ताच एक्सप्रेस**

**आष्टी/प्रतिनिधी/सोपान वाघमारे**/येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या शालेय व्यवस्थापन समितीची निवड प्रक्रिया आज मंगळवार, दिनांक १७ फेब्रुवारी २०२६ रोजी उत्साहात पार पडली.

या निवड प्रक्रियेत अमोल आगळे यांची अध्यक्षपदी, तर संतोष पोटे यांची उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

**लोकशाही मार्गाने बिनविरोध निवड**

शाळेच्या प्रगतीसाठी आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत महत्त्वाची मानली जाणारी ही निवड प्रक्रिया मुख्याध्यापक बजरंगे सर, शिक्षक वृंद, पालक आणि ग्रामस्थांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. विशेष म्हणजे, कोणत्याही वादाविना सर्व सदस्यांची निवड एकमताने आणि बिनविरोध करण्यात आली, ज्यामुळे गावातील एकीचे दर्शन घडले.

**नवनिर्वाचित समिती सदस्य**

अध्यक्ष आणि उपाध्यक्षांसोबतच खालील सदस्यांचीही सर्वसंमतीने निवड करण्यात आली आहे, गणेश पोटे, दादाराव नवल, सिद्धार्थ खरात, अशोक गायकवाड, लहू सोनटक्के, सोपान वाघमारे,परमेश्वरा केकान, अशोक उर्फ श्याम पोटे, हनुमान पोटे, दयानंद मैद, केशव कडपे व अशोक पोटे.



या निवड प्रक्रियेवेळी गावातील प्रतिष्ठीत नागरिक, पालक आणि तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नवनिर्वाचित समितीने शाळेच्या भौतिक सुविधा आणि शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यासाठी कटिबद्ध राहण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. निवडीनंतर नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे गावकऱ्यांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या शेवटी मुख्याध्यापक बजरंगे सर यांनी उपस्थित सर्व ग्रामस्थ आणि पालकांचे आभार मानले व निवड प्रक्रिया यशस्वीरीत्या पार पाडल्याबद्दल सर्वांचे कौतुक केले.

**जालन्याचा झेंडा जेईई परीक्षेत पान ३ वरून..**

पान ३ वरून..

केवळ खंडेलवाल परिवारासाठीच नाही, तर संपूर्ण जालन्यासाठी अभिमानास्पद आहे. अशाच हुशार विद्यार्थ्यांमुळे जिल्ह्याचे नाव शैक्षणिक क्षेत्रात मोठे होत आहे, असे गौरवउद्गार गोरंटयाल यांनी यावेळी काढले.या कौतुक सोहळ्याप्रसंगी आयनचे मार्गदर्शक अंकुश सोनवणे यांचाही विशेष सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला चेतन खंडेलवाल यांच्यासह रोहित भुरेवाल, अंकित आबड,पंडित उमेश सारस्वत, विजय पवार,किरण झारकंडे, आनंद झारकंडे,शिवाजी शेजुळ, अक्षय झारकंडे, संतोष पंगुलवाले यांच्यासह मित्रपरिवार आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लोकवर्गणीला फाटा देत पंकज बागल यांचा 'स्वखर्चातून' शिवजन्मोत्सव; जालन्यात स्तुत्य उपक्रमाची चर्चा

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (विशेष प्रतिनिधी)** सध्याच्या काळात सार्वजनिक उत्सव म्हटले की देणग्या, जाहिराती आणि राजकीय वरदहस्त असेच समीकरण पाहायला मिळते. मात्र, जालन्यातील युवा कार्यकर्ते पंकज बागल यांनी या परंपरेला छेद देत, कुणाकडूनही एक दमडीही न घेता स्वखर्चातून शिवजयंती साजरी करण्याचा अभिनव उपक्रम राबविला आहे. त्यांच्या या उपक्रमाचे शहरात सर्वत्र कौतुक होत आहे.

राजकारण आणि वर्गणीला दिला फाटा

अनेकदा महापुरुषांच्या जयंतीचे निमित्त साधून वर्गणीसाठी व्यापाऱ्यांना किंवा उद्योजकांना वेठीस धरले जाते. मात्र, पंकज बागल यांनी यंदा कोणत्याही राजकीय मंडळींकडून, व्यापाऱ्यांकडून किंवा उद्योजकांकडून देणगी न घेता, स्वतःच्या आर्थिक नियोजनातून शिवजयंतीनिमित्त शिवगीतांचा व व्याख्यानाचा भव्य कार्यक्रम आयोजित केला.

उत्सव हा भावनेचा विषय आहे, तो प्रदर्शनाचा किंवा वसुलीचा माध्यम नसावा, असा संदेशच जणू त्यांनी यातून दिला आहे.

> आजच्या काळात जिथे प्रत्येक कार्यक्रमासाठी लोकवर्गणीवर अवलंबून राहावे लागते, तिथे स्वतःच्या खर्चातून एवढा मोठा प्रबोधनपर कार्यक्रम घेणे ही कौतुकास्पद बाब आहे.
>
> **- उपस्थित मान्यवर**

व्याख्यान आणि शिवगीतांची मेजवानी

अंबड चौफुली परिसरात आयोजित या कार्यक्रमात शिवरायांच्या विचारांचा जागर करण्यात आला.प्रबोधन: महाराष्ट्रातील ख्यातनाम शिवव्याख्याते रामजी गाडे यांनी आपल्या पहाडी आवाजात शिवचरित्रातील पैलू उलगडून दाखवले.सांस्कृतिक कार्यक्रम: व्याख्यानानंतर शिवगीतकार रविंद्र कोकणे यांनी आपल्या गाण्यांतून उपस्थितांमध्ये चैतन्य निर्माण केले.

कार्यक्रमाचा प्रारंभ छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आला. याप्रसंगी जालना महानगरपालिकेच्या प्रथम महापौर वंदना मगरे आणि उपमहापौर राजेश राऊत यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांनी पंकज बागल यांच्या या नि:स्वार्थी उपक्रमाचे विशेष कौतुक केले.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी



शिवजयंती समितीचे अध्यक्ष पंकज बागल यांच्यासह उपाध्यक्ष सातफुले, राज कबाळे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी अहोरात्र परिश्रम घेतले. यावेळी शहर व परिसरातील शिवप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जालन्यात शिवजयंतीचा उत्साह: बाजारपेठ भगव्या रंगात न्हाली; झेंडे खरेदीसाठी शिवप्रेमींची गर्दी



**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी**/ हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती (शिवजयंती) अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपली आहे. या निमित्ताने जालना शहरात उत्साहाचे वातावरण असून, मुख्य बाजारपेठ भगव्या झेंड्यांनी आणि शिवकालीन साहित्याने फुलून गेली आहे. शहरातील कापड बाजार, मामा चौक आणि मुख्य रस्त्यांवरील दुकानांमध्ये विविध आकाराचे भगवे झेंडे विक्रीसाठी दाखल झाले आहेत.

बाजारपेठेत भगवे वादळ

शिवजयंतीचा उत्सव भव्य स्वरूपात साजरा करण्यासाठी जालन्यातील तरुण मंडळ आणि शिवप्रेमी सज्ज झाले आहेत. यंदा बाजारात साध्या कापडापासून ते साटीन आणि सिल्कच्या कापडापर्यंतचे विविध झेंडे उपलब्ध आहेत. यासोबतच:

गाड्यांसाठी छोटे झेंडे आणि स्टिकर्स,फेटे आणि टी-शर्ट्स ज्यावर महाराजांच्या प्रतिमा आहेत.

किल्ले आणि तोरणांच्या प्रतिकृती.

छायाचित्रांच्या माध्यमातून शिवभक्तीचा जागर आज बाजारपेठेत शिवप्रेमींची मोठी लगबग पाहायला मिळाली. अनेक तरुण आपल्या दुचाकी आणि चारचाकी वाहनांसाठी झेंडे खरेदी करताना दिसत आहेत. याच दरम्यान, शहरातील प्रसिद्ध छायाचित्रकार किरण खानापुरे यांनी बाजारपेठेतील हा उत्साह आपल्या कॅमेऱ्यात टिपला आहे. झेंडे खरेदी करताना शिवप्रेमींच्या चेहऱ्यावरील आनंद आणि बाजारपेठेतील भगवा माहोल त्यांच्या छायाचित्रातून जिवंत झाला आहे.

**व्यापाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण**

गेल्या दोन दिवसांपासून झेंड्यांच्या मागणीत मोठी वाढ झाली असल्याचे स्थानिक व्यापाऱ्यांनी सांगितले. ग्रामीण भागातूनही अनेक शिवभक्त जालन्यात खरेदीसाठी येत आहेत. यंदा झेंड्यांच्या डिझाइनमध्ये वैविध्य असून, डिजिटल प्रिंट असलेल्या झेंड्यांना तरुणांकडून मोठी पसंती मिळत आहे, असे एका विक्रेत्याने सांगितले. शिवजयंतीच्या पूर्वसंध्येला जालना शहर 'शिवमय' झाले असून, किरण खानापुरे यांनी टिपलेली छायाचित्रे सोशल मीडियावरही चर्चेचा विषय ठरत आहेत.

# मातीचा सुगंध, हातात लॅपटॉप अन् डोक्यात स्वप्नं! हिवर्डीच्या विशाल भुतेकरचे गुजरातमध्ये 'सुवर्ण' यश

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी**/जिद्द आणि मेहनतीला कशाचीच मर्यादा नसते, हे जालना जिल्ह्यातील एका ग्रामीण युवकाने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. जालना तालुक्यातील हिवर्डी या छोट्याशा गावातून आलेल्या विशााल राजेश भुतेकर याने गुजरातमध्ये आयोजित 'इंडियास्किल्स स्पर्धा २०२५-२६' च्या पश्चिम विभागीय स्पर्धेत सॉफ्टवेअर प्लिकेशन डेव्हलपमेंट या विषयात सुवर्णपदक पटकावून जिल्ह्याचा झेंडा राष्ट्रीय स्तरावर फडकवला आहे.

पाच राज्यांच्या चुरशीत अव्वल स्थान

पश्चिम विभागीय स्पर्धेत महाराष्ट्र, गुजरात, गोवा यांसह पाच राज्यांतील नामांकित आणि बुद्धिमान स्पर्धकांनी सहभाग नोंदवला होता. या अत्यंत कठीण आणि चुरशीच्या स्पर्धेत विशालने आपल्या कोडिंग कौशल्याने सर्वांना भारावून टाकले. सॉफ्टवेअर क्षेत्रातील तांत्रिक गुंतागुंत सोडवताना त्याने दाखवलेली तार्किक विचारशक्ती आणि नाविन्यपूर्ण उपाय यामुळे त्याला परीक्षकांनी प्रथम क्रमांकाने गौरविले.

कठोर कसोट्यांवर उतरले खरे

या स्पर्धेत केवळ कोडिंगच नाही, तर अनेक तांत्रिक निकषांवर स्पर्धकांचे मूल्यमापन करण्यात आले.अचूक कोडिंग आणि लॉजिक: दिलेल्या वेळेत कार्यक्षम सॉफ्टवेअर तयार करणे.डेटाबेस मॅनेजमेंट: माहितीचे योग्य साठवणूक आणि व्यवस्थापन.युजर इंटरफेस (णख) डिझाईन: सॉफ्टवेअर वापरण्यास सुलभ आणि आकर्षक बनवणे.सादरीकरण: तयार केलेल्या सॉफ्टवेअरचे प्रभावी सादरीकरण करणे.या सर्व पातळ्यांवर विशालने उत्कृष्ट कामगिरी बजावली. विशाल सध्या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे संगणक अभियांत्रिकीच्या तिसऱ्या वर्षात शिक्षण घेत आहे.




ग्रामीण भागासाठी प्रेरणादायी प्रवास

हिवर्डीसारख्या ग्रामीण पार्श्वभूमीतून आलेल्या विद्यार्थ्याने आयटी (खढ) सारख्या अत्याधुनिक क्षेत्रात हे यश मिळवणे कौतुकास्पद आहे. साधनसामग्री मर्यादित असतानाही केवळ जिद्दीच्या जोरावर विशालने हे शिखर गाठले आहे. आपल्या यशाबद्दल बोलताना विशाल म्हणाला, मर्यादित साधनसामग्री असली तरी जिद्द आणि सातत्य असेल तर स्वप्ने पूर्ण होतात. माझ्या यशाचे श्रेय आई-वडील आणि माझ्या मार्गदर्शक प्राध्यापकांना जाते.

आता लक्ष नोएडातील राष्ट्रीय स्पर्धेकडे!

विभागीय स्तरावर सुवर्णपदक पटकावल्यानंतर विशालची निवड आता नोएडा (दिल्ली) येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्तरावरील अंतिम स्पर्धेसाठी झाली आहे. या ठिकाणी तो संपूर्ण पश्चिम भारताचे प्रतिनिधित्व करणार आहे. या राष्ट्रीय स्पर्धेतील विजयानंतर जागतिक स्तरावरील 'वर्ल्ड स्किल्स' स्पर्धेचे दरवाजे त्याच्यासाठी उघडू शकतात.

गावात आनंदाचे वातावरण

विशालच्या या यशाने हिवर्डी गावात उत्सवाचे वातावरण आहे. ग्रामस्थांकडून त्याच्या सत्काराची जय्यत तयारी सुरू असून, मातीचा सुगंध मनात ठेवून लॅपटॉपच्या साहाय्याने जग जिंकायला निघालेला आमचा विशाल अशा शब्दांत गावकरी त्याचा गौरव करत आहेत.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट ॲण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813